**:– फौजदारी किरकोळ अर्ज नं. ५६/२०२६ –:**
**–: नि. ०१ वरील आदेश :–**

अर्जदार अरुण पांडुरंग गावडे यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जदार यांनी सदरचा अर्ज त्यांच्या मालकीचा गावठी जातीचा सुमारे ६ वर्षे वयाचा तपकिरी रंगाचा लहान शिंग असलेला बैल व एक गावठी जातीचा सुमारे ६ वर्षे वयाचा लालसर रंगाचा लहान शिंगे असलेला बैल अशा एकुण २ जनावरांचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सावंतवाडी पोलिस ठाणे यांनी गु. र. क्र. २९/२०२६, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियमचे कलम ११ (१)(डी), ११ (१)(इ),११ (१)(एफ), महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमचे कलम ५ए, ५बी, ९, मोटार वाहन कायदा कलम ६६/१९२, १८४, महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ११९ व भारतीय न्याय संहिता कलम ३(५) अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये सदरचे बैल ताब्यात घेण्यात आले आहेत. सदर बैल सध्या सांगेली गोशाळा येथे ठेवण्यात आले आहेत. त्याठिकाणी सदर जनावरांची योग्य काळजी घेतली जाणार नाही. सदरचे बैल त्यांनी शेतीसाठी खरेदी केले होते. त्यांची योग्य रितीने देखभाल न केल्यास अर्जदाराला त्याच्या जनावरापासून मुकावे लागणार आहे. त्यामुळे सदर बैलांचा ताबा मिळावा अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

२. सदर अर्जावर सरकारी वकीलांनी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार याने सदर बैल खरेदी केले त्याबाबत पुरावा दाखल केला नाही. जप्त बैल अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास त्यांना पुन्हा क्रुरतेची वागणुक देतील व त्यांची कत्तल करण्याची शक्यता आहे. सबब अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे. तपासिक अधिकारी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर जनावरे अर्जदार यांच्या ताब्यात दिल्यास अर्जदार पुन्हा जनावरांची असुरक्षितरित्या वाहतुक व विक्री करण्याची शक्यता आहे. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अध्यक्ष, श्रीकृष्ण गोशाळा सेवाभावी संस्था सांगेली यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जदार यांची जनावरे एका बैलाचा खर्च दरदिवशी रक्कम रुपये १,०००/- इतका अर्जदार यांना देण्याचा आदेश करण्यात यावा असे कथन केले आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. अर्जदार व अभियोग पक्ष यांचा युक्तीवाद ऐकला.

७. अर्जदार याच्या कथनानुसार त्यांच्या मालकीचे दोन बैल सावंतवाडी पोलिस ठाणे यांनी पकडलेले असून सध्या पोलिसांनी तात्पुरते गोशाळेत ठेवलेले आहेत. अर्जदार यांचे व्यतिरिक्त सदर जनावरांवर आणखी कोणीही मालकी सांगत नाही. तसेच इतर कोणीही सदर बैल ताब्यात मिळणेबाबत अर्ज केलेला नाही. अर्जदार यांनी बैल खरेदी केल्याबाबतची पावती हजर केली आहे. अर्जदार हा सदर बैलांचा वापर शेतीसाठी करीत असल्याचे त्याने कथन केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास होवून दोषारोपपत्र दाखल होवून निकाली होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदरचे बैल अर्जदार यांचे ताब्यात योग्य अटी व शर्तीवर देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्जदार यांचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. तपासि अंमलदार यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी सावंतवाडी पोलिस स्टेशन येथील गुन्हा रजि. क्र.२९/२०२६ मधील जप्त गावठी जातीचा सुमारे ६ वर्षे वयाचा तपकिरी रंगाचा लहान शिंग असलेला बैल व एक गावठी जातीचा सुमारे ६ वर्षे वयाचा लालसर रंगाचा लहान शिंगे असलेला बैल अशा एकुण २ जनावरांचा अंतरिम ताबा अर्जदार याची ओळखीबाबत पडताळणी करुन त्याच्याकडुन रक्कम रुपये १,००,०००/- (रक्कम रुपये एक लाख मात्र) चे क्षतीपूर्ती बंधपत्र स्विकारुन खालील अटी, शर्तींना अधीन राहुन परत देण्यात यावा.

अ. अर्जदार याने जप्त २ बैलांचा चारा पाणी व उपचाराचा प्रतिदीन रक्कम प्रत्येकी रुपये २००/–प्रमाणे दिनांक १२/०२/२०२६ रोजीपासुन सदर बैल प्रत्यक्षात ताब्यात घेईपर्यंतचा खर्च संबंधित गोशाळा यांना द्यावा.

ब. अर्जदार याने सदर जनावराचे योग्य पालन पोषण व संगोपन करावे व त्याचा गैरवापर करु नये.

०३. तपासिक अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, सदर बैल ताब्यात देताना पंचासमक्ष सदर बैलांचा फोटो घेवून त्याबाबत रितसर पंचनामा करावा.

०४. न्यायालय किंवा तपासि अंमलदार यांनी आदेशित केल्यास अर्जदार यांनी सदर बैल वेळोवेळी प्रकरणाच्या चौकशी दरम्यान, सुनावणी दरम्यान व अंतिम निकालापर्यंत हजर करावे.

०५. तपासिक अधिकारी यांनी वरील आदेशाची पूर्तता झाल्यानंतर सदरचा बैल अर्जदार यांच्या ताब्यात द्यावा.

०६. तपासिक अंमलदार यांना असे आदेशित करण्यात येते की, सदरचे क्षतीपूर्ती बंधपत्र व रक्कम भरलेबाबतचा अहवाल न्यायालयात हजर करणेचा आहे.

०७. वरील आदेशाप्रमाणे संबंधित पोलिस ठाण्यास पत्र पाठवावे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.03.31 15:02:39 +0530

दिनांक :–३०/०३/२०२६ (जा. म. मिस्त्री )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
सावंतवाडी.